महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १२५/प्रनिप्रा/१२१०

दिनांक : 20 MAY 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, **दिनांक १९ एप्रिल, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ५४व्या बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य १) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व २) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ४) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक हे काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

डॉ. हरिहर कौसाडिकर, संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे व डॉ. मंगेश बापू निकम, परिक्षा समन्वयक, कृषी शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबइ्र हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | १९/०४/२०२२ | दुपारी १२:०० वा. | कृषी शिक्षण | B.F.Sc. (Fisheries Science) and B.F.Sc. (Fisheries) |
| | | दुपारी ०३:०० वा. | | B.Tech. (Biotechnology) |

संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे यांनी दिनांक १४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक B.F.Sc. (Fisheries Science), B.F.Sc. (Fisheries) व B.Tech. (Biotechnology) या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार कृषी शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितीतील उक्त नमूद अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय अहवाल प्राधिकरणास सादर केला आहे.

संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे यांनी व्यावसायिक कृषी शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष व्यावसायिक B.F.Sc. (Fisheries Science), B.F.Sc. (Fisheries) व B.Tech. (Biotechnology) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालाचे बैठकीमध्ये अवलोकन करण्यात आले, तसेच अभ्यासक्रम / महाविद्यालय निहाय प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांची प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४(ड) मधील निर्देशास अनुसरुन निवडक पध्दतीने छाननी करण्यात आली व तद्नंतर सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले,-

१) शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सयव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक मकृप १०१९/प्र.क्र. १०१/७-अे, दिनांक ११/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२० या वर्षापासून शासकीय/शासन अनुदानित/शासन अनुदानित अल्पसंख्याक/महानगरपालिका संचलित महाविद्यालयातील प्रवेश मान्यता आणि प्रवेश प्रकिक्रया राबविण्यात येणाऱ्या खर्चाची प्रतीपूर्ती होण्यासाठी प्रवेश प्रक्रिया शुल्क आकारणी संबंधी मुद्यांबाबत शासनाच्या सदरील पत्रानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक प्रथम वर्ष व्यावसायिक B.F.Sc. (Fisheries Science), B.F.Sc. (Fisheries) व B.Tech. (Biotechnology) या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालनालय, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे यांनी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे, अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

नियामक प्राधिकरणाची तात्पुरती मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | एकुण महाविद्यालये | शासकीय / अनुदानित / अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालये (प्रपत्र-अ) | | अमान्य प्रवेश (प्रपत्र-ब) | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-क) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महाविद्यालये | प्रवेशित विद्यार्थी | महाविद्यालये | विद्यार्थी | महाविद्यालये | त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेली विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १) | B.F.Sc. (Fisheries Science) | ०१ | ०१ | ३८ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २) | B.Tech. (Biotechnology) | १८ | ०२ | ८३ | ०१ | ६२ | १५ | ०८ | ०१ | ६७४ |
| **एकुण :** | | | ०३ | १२१ | ०१ | ६२ | १५ | ०८ | ०१ | ६७४ |

उक्त तालिकेतील अभ्यासक्रम व महाविद्यालय निहाय तपशीलवार माहिती प्रपत्र - अ, ब क मध्ये सोबत जोडलेली आहे.

तालिकेतील दर्शविलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत,-

१) उक्त तालिकेतील स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेली महाविद्यालये शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयांच्या संदर्भात शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सयव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक मकृप १०१९/प्र.क्र. १०१/७-अे, दिनांक ११/१२/२०१९ रोजीच्या पत्रास अनुसरुन संचालनालय, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे यांनी उचित कार्यवाही करावी.

२) उक्त स्तंभ क्रमांक ६ मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार रितसर प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

३) स्तंभ क्रमांक ८ मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयांची अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत त्यामुळे सदरील प्रवेश अमान्य करण्यात येत आहे. या संदर्भात मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करतील.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, अशा महाविद्यालयांना (प्रपत्र-क नुसार) प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२०-२१ नुसार) कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) सीईटी कक्षातील कला शिक्षण विभागातील कामकाजाकरिता संचालनालय, कला शिक्षण, मुंबई येथे निव्वळ कंत्राटी तत्वावर कार्यरत श्री. पंकज पाटील, लिपिक - टंकलेखक यांच्या कंत्राटी तत्वावरील नेमणूकीस रु. १५०००/- मासिक मानधन अदा करण्याच्या अटींवर दिनांक १/०४/२०२२ पासून मान्यता देण्यात येत आहे.

(ख) राज्य सामाईक प्रवेश परीक्षाकरिता श्रीमती रेखा रेडेकर, सफाईगार व श्रीमती माया गोडे, सफाईगार यांची निव्वळ कंत्राटी तत्वावर रु. १२०००/- मासिक मानधन अदा करण्याच्या अटींवर नेमणूक करण्यास दिनांक ४/०३/२०२२ पासून प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

(ग) प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई येथील निव्वळ कंत्राटी तत्वावरील कार्यरत श्रीमती भारती, विधी सहाय्यक यांना दरमहा रु. २५०००/- एवढया ठोक मासिक मानधन निश्चितीवर नेमणूक करण्यास दिनांक १७/०३/२०२२ पासून प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

वरील प्रमाणे कर्मचाऱ्यांची ११ महिन्यांकरिता किंवा पुढील आदेश होईपर्यंत, या पैंकी जे अगोदर होईल त्यानुसार नियुक्ती करण्याबाबत सुधारित आदेश मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना सादर करावेत, प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष कार्यालयातील रिक्त पदे भरण्याकरिता सेवापुरवठादार यांची नेमूणक करण्याबाबत उचित कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले. उपरोक्त तात्पुरती कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली पदे सेवा पुरवठादारांची नेमणूक होईपर्यंत करण्यात येत आहेत, तद्नंतर अशी पदे सेवापुरवठादारा मार्फत भरण्यात येतील.

(घ) प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावरील गट - क व गट - ड संवर्गातील कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, सेवा व शर्ती संबंधीत मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(२) मधील निर्णयानुसार गठित करण्यात आलेल्या समितीने त्वरीत कार्यवाही करुन त्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा. याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी आवश्यकतेनुसार कार्यालयीन आदेश निर्गमित करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता १) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, २) संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे, ३) डॉ. मंगेश( बापू पी.कदम,) परिक्षा समन्वयक, कृषी

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी माहिती/अहवाल सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : १९/५/२२